दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी
छत्रपती संभाजीनगर ❀ सोमवार, दि. १७ ऑगस्ट २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ११७ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com

## थोडक्यात वार्ता

### 'वंदे मातरम'च्या अपमानावरून सोनिया गांधींविरोधात तक्रार

**कर्नाटक :** 'वंदे मातरम'च्या अपमानावरून काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. कर्नाटकातील मंगळूर येथील उर्वा पोलीस ठाण्यात भाजप नेत्यांकडून सोनिया गांधी यांच्याविरोधात औपचारिक तक्रार दाखल करण्यात आली आहे. स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमात 'वंदे मातरम' गायले जात असताना ते दोन कडव्यांनंतर थांबवण्याचे निर्देश दिल्याचा आरोप भाजपकडून करण्यात आला आहे.

भाजप नेत्यांकडून कायदेशीर कारवाईची मागणी : भाजप नेते विकास पुत्तूर यांनी या प्रकरणी पोलिसांकडे तक्रार दाखल केली आहे. त्यांच्या आरोपानुसार, १५ ऑगस्ट रोजी काँग्रेसच्या राष्ट्रीय मुख्यालयात ध्वजारोहण कार्यक्रमादरम्यान 'वंदे मातरम' सुरू असताना सोनिया गांधी यांनी कार्यक्रमात हस्तक्षेप केला आणि ते थांबवण्यास सांगितले. पुत्तूर यांनी या कृतीवर आक्षेप घेत, याप्रकरणी एफआयआर दाखल करून कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. राष्ट्रीय गीताचा किंवा राष्ट्रीय सन्मानाचा अवमान झाल्यास संबंधित व्यक्तीचे पद किंवा राजकीय स्थान न पाहता कायद्यानुसार कारवाई झाली पाहिजे, असा दावा त्यांनी केला.

### 'तुमचे हे पाप देशातील जनता कधीच माफ करणार नाही' : अमित शहा

**नवी दिल्ली :** नवी दिल्लीतील काँग्रेस मुख्यालयात (इंदिरा भवन) स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमादरम्यान राष्ट्रगीत/गीत 'वंदे मातरम्'च्या गायनावरून देशाच्या राजकारणात मोठा वाद निर्माण झाला आहे. काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी 'वंदे मातरम्'चे गायन मध्येच थांबवण्यास सांगितल्याचा गंभीर आरोप भाजपने केला आहे. या मुद्द्यावरून केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सोनिया गांधींवर अत्यंत तीव्र शब्दांत टीका केली आहे. याप्रकरणी आता कर्नाटकात भाजपने अधिकृत पोलीस तक्रारही दाखल केली आहे. राजस्थानमधील चित्तौडगड येथे एका जाहीर सभेत बोलताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी काँग्रेस पक्षावर आणि सोनिया गांधींवर कडक शब्दांत ताशेरे ओढले. अमित शहा म्हणाले की, "मतपेढीच्या राजकारणाच्या लालसेपोटी काँग्रेसने नेहमीच 'वंदे मातरम्'ला विसरण्याचे काम केले आहे. ८० वर्षांनंतर बंकिम चंद्र चट्टोपाध्याय यांच्या या अमर गीताला पुन्हा सन्मान मिळत आहे, हेही सोनिया गांधींना सहन होत नाही. काँग्रेस मुख्यालयात 'वंदे मातरम्' सुरू असताना सोनिया गांधींनी काँग्रेस अध्यक्षांना ते गाणे थांबवण्यास सांगितले. सोनिया जी, १४० कोटी जनता हे पाहत आहे. तुम्ही केलेले हे पाप देश कधीही माफ करणार नाही."

### "विरोधी नेत्यांना 'दिमागी नक्षलवादी' म्हटले नाही"

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लाल किल्ल्यावरील स्वातंत्र्यदिनाच्या भाषणातील 'दिमागी नक्षलवादी' (वैचारिक नक्षलवादी) या उल्लेखावरून निर्माण झालेल्या वादावर केंद्रीय संसदीय बाबी मंत्री किरण रिजिजू यांनी स्पष्टीकरण दिले आहे. पंतप्रधानांनी कोणत्याही विरोधी नेत्यांना 'नक्षलवादी मानसिकतेचे' म्हटले नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. केंद्रीय मंत्री किरण रिजिजू यांनी 'दिमागी नक्षलवादी' नेमके कोण आहेत हे स्पष्ट करताना सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर पोस्ट करत तीन प्रमुख मुद्दे मांडले आहेत; त्यानुसार, जे नक्षलवाद्यांचे समर्थन करतात आणि भारतीय संविधानाचा स्वीकार करत नाहीत, जे फुटीरतावाद्यांच्या बाजूने उभे राहतात आणि कलम ३७० चे समर्थन करतात, तसेच जे भारताच्या उत्तर-पूर्वेकडील राज्यांना देशापासून वेगळे करण्यासाठी 'चिकन नेक' कॉरिडोअर तोडण्याची भाषा करतात, तेच 'दिमागी नक्षलवादी' आहेत. शनिवारी ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त लाल किल्ल्यावरून देशवासीयांना संबोधित करताना पंतप्रधान मोदींनी देशातून सशस्त्र नक्षलवादाचे यशस्वीपणे उच्चाटन केल्याबद्दल देशवासीयांचे अभिनंदन केले होते आणि सुरक्षा दलांच्या बलिदानाचे स्मरण केले होते.

## "शाल जोडे"




# श्रावण च्या पहिला शनिवारी श्री भद्रा मारुती दर्शना साठी जय भद्राच्या गजरात लाखो भाविकां भक्तांची गर्दी

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

**खुलताबाद प्रतिनिधी :** खुलताबाद १३ ऑगस्ट पासून श्रावण महिन्यास प्रारंभ झाला असून श्रावणातील पहिल्या शनिवारी पायी दिंड्या. मोठ्या प्रमाणात भाविक भक्त आपापल्या सुईने या ठिकाणी येत असतात यात. छत्रपती संभाजी नगर जालना परभणी नांदेड अहिल्यानगर श्रीरामपूर नाशिक मुंबई मनमाड शिर्डी चाळीसगाव सह महाराष्ट्र भरातून भाविक मोठ्या प्रमाणात येतात.( पहिला शनिवार व १५ ऑगस्ट असल्याने भद्रा मारुतीची मूर्ती फुलांच्या साह्याने तिरंगा ध्वज आरशाने मनमोहक पद्धतीने सजवण्यात आली होती )

आलेल्या भाविकांना या ठिकाणी मोठ्या प्रमाणात भंडारा महाप्रसादाचे आयोजन भाविकांच्या वतीने करण्यात येते. तसेच इतर दिवस श्रावण महिन्यात भाविकांची मोठी गर्दी असते यासाठी महाराष्ट्र भरातून भद्रा मारुतीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना सुख सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संस्थांच्या वतीने प्रामुख्याने लक्ष देऊन भाविकांचे सुरळीत दर्शन व्हावे यासाठी सुरक्षिततेसह सुविधांवर विशेष भर;व छत्रपती संभाजीनगर–खुलताबाद



मार्गावर जादा बसफेऱ्यांची व्यवस्था या पार्श्वभूमीवर श्री भद्रा मारुती संस्थान व प्रशासनाच्या वतीने भाविकांच्या सुरक्षिततेसह विविध सोयी-सुविधांची तयारी करण्यात आली

भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने मंदिर परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून, कडेकोट सुरक्षा व्यवस्था उभारण्यात आली आहे. तसेच दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना ऊन व पावसाचा त्रास होऊ नये, यासाठी मंदिर परिसरात भव्य मंडप शेड उभारण्यात आले आहे.

श्रावणातील प्रत्येक शनिवारी भाविकांची मोठी गर्दी होणार असल्याने दर्शन प्रक्रिया सुलभ व सुरळीत पार पडावी, तसेच भाविकांची कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. सुरक्षा, दर्शन व्यवस्था, पिण्याचे पाणी, निवारा यांसह ॲम्बुलन्स आवश्यक सुविधांकडे विशेष लक्ष देण्यात येत आहे.

याबाबत श्री भद्रा मारुती संस्थानचे अध्यक्ष मिटू पाटील बारगळ मंत्री अतुल सावे माजी खासदार चंद्रकांत खैरे व जनसंपर्क अधिकारी राजेंद्र जोंधळे यांच्यासह संस्थांचे सर्व पदाधिकारी नियोजन करत आहे

जादा बसफेऱ्यांची व्यवस्था

दरम्यान, श्रावण महिन्यात वाढणारी भाविकांची गर्दी लक्षात घेऊन प्रवासाचीही विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. स्मार्ट सिटी बस तसेच एस टी महामंडळाच्या वतीने छत्रपती संभाजीनगर–खुलताबाद मार्गावर जादा बसफेऱ्या उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे भाविकांचा प्रवास अधिक सोयीचा होणार आहे.

, भाविकांना सुरक्षित, सुलभ व सुरळीत दर्शन मिळावे यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येत आहेत.

# शहराच्या सर्वांगीण विकासासाठी एकजुटीने काम करूया : महापौर समीर राजूरकर

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** भारतीय स्वातंत्र्याच्या ८०व्या वर्धापन दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका मुख्यालयात महापौर समीर राजूरकर यांच्या हस्ते सकाळी ८ वाजता ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी नागरिकांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा देताना महापौरांनी 'विकसित छत्रपती संभाजीनगर २०४७' हे शहराच्या विकासाचे ध्येय ठेवून सर्व घटकांच्या सहकार्याने शहराला देशातील प्रगत, सुंदर, सक्षम आणि आदर्श शहर बनविण्याचा निर्धार व्यक्त केला.



यावेळी स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, विरोधी पक्षनेते अब्दुल समीर साजिद, गलिच्छ वस्ती सुधार समिती सभापती जालिंदर शेंडगे, गटनेते किशोर नागरे, हाजी शेरखान, सदस्य रशीद मामू, सचिन खैरे, सदस्या कीर्ती शिंदे, वॉर्ड सभापती अनिता मानकापे तसेच महानगरपालिकेचे सर्व सदस्य-सदस्या आणि मनपा आयुक्त अमोल येडगे यांची उपस्थिती होती.

स्वातंत्र्यलढ्यात प्राणांचे बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांना तसेच स्वातंत्र्यसैनिकांना विनम्र अभिवादन करून महापौर राजूरकर म्हणाले की, छत्रपती संभाजीनगरला समृद्ध ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा लाभला आहे. मलिक अंबर यांच्या नगररचनेतून निर्माण झालेल्या ऐतिहासिक वास्तू, जलव्यवस्थापन आणि शहर नियोजनाचा वारसा आजही शहराच्या ओळखीचा महत्त्वाचा भाग आहे. या वारशाचे जतन करत आधुनिक आणि विकसित शहराची निर्मिती करण्याची जबाबदारी सर्वांची आहे.

**'विकसित छत्रपती संभाजीनगर २०४७'चा आराखडा तयार करण्यावर भर :** आगामी वीस वर्षांचा विचार करून शहराच्या विकासाचे नियोजन करणे आवश्यक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'विकसित भारत २०४७'चे उद्दिष्ट निश्चित केले असून, महाराष्ट्र सरकारनेही 'विकसित महाराष्ट्र २०४७'चे लक्ष्य ठेवले आहे. त्याच धर्तीवर 'विकसित छत्रपती संभाजीनगर २०४७'चा आराखडा तयार करून शहराच्या सर्वांगीण विकासाला दिशा देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. वाढते औद्योगिकीकरण आणि शहराचा विस्तार लक्षात घेता महानगरपालिकेची जबाबदारी वाढली आहे. भविष्यातील गरजा लक्षात घेऊन दीर्घकालीन धोरण आखणे गरजेचे असल्याचे महापौरांनी नमूद केले.

**पाणीपुरवठा, जल-मल निस्सारणाला प्राधान्य :** शहरातील मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा करताना पाणीपुरवठा आणि जल-मल निस्सारण व्यवस्थेला प्राधान्य देण्यात येणार आहे. नवीन पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्णत्वाकडे जात असताना अंतर्गत जलवाहिन्यांचे जाळे सक्षम करण्याची गरज आहे.

# उच्च न्यायालयाच्या लिपिक पदाच्या परीक्षेत गोंधळ; पुनर्परीक्षेची मागणी



हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** बॉम्बे हायकोर्टाच्या लिपिक (क्लर्क) पदासाठी रविवारी (दि. १६ ऑगस्ट) आयोजित केलेल्या ऑनलाइन परीक्षेत छत्रपती संभाजीनगरमधील एका केंद्रावर प्रचंड तांत्रिक बिघाड झाल्यामुळे मोठा गोंधळ उडाला. शहरातील सेव्हन हिल परिसरातील सुराणानगर येथील 'बाइट झेड्स इन्फोटेक' या परीक्षा केंद्रावर हा प्रकार घडला. परीक्षेदरम्यान जुने संगणक आणि नादुरुस्त की-बोर्डमुळे विद्यार्थ्यांना नाहक मनस्ताप सहन करावा लागला. प्रशासनाच्या या अनागोंदी कारभाराविरोधात विद्यार्थ्यांनी संताप व्यक्त करत परीक्षा केंद्रावर घोषणाबाजी केली, तर काहींना या तणावामुळे अश्रू अनावर झाले.

परीक्षा केंद्रावर पोहोचलेल्या विद्यार्थ्यांना अत्यंत जुनाट संगणक आणि निकृष्ट दर्जाचे की-बोर्ड देण्यात आले होते. प्रत्यक्ष पेपर सुरू झाल्यानंतर अनेकांचे संगणक हँग होऊ लागले, तर काही जणांचे की-बोर्ड कामच करत नव्हते. या तांत्रिक अडचणींमुळे विद्यार्थ्यांचा बहुमूल्य वेळ वाया गेला.

# प्रत्येक पालकमंत्र्यांनी स्वत: जिल्ह्याच्या सर्व गोशाळा दत्तक घ्यावा अशी मागणी गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :**गौरक्षक सेना महाराष्ट्र च्या वतीने नामदार श्रीमती मेघनादीदी साकोरे बोर्डीकर (महाराष्ट्र राज्य सरकार राज्य मंत्री तथा पालकमंत्री परभणी) त्यांच्याकडे जिल्हाधिकारी मध्ये खाली दिलेल्या विषयांमध्ये प्रत्येक पालकमंत्र्यांनी आपल्या जिल्ह्यात सर्व गोशाळा चारा पाण्यासाठी दत्तक घ्याव्या 2) सर्व नोंदणीकृत गोशाळा चारा पाण्याच्या व्यवस्थेसाठी पालक मंत्र्यांनी आपण आपल्या स्वतःच्या जिल्ह्यात दत्तक घेणेबाबत ३) महाराष्ट्र गोसेवा आयोगामध्ये संचालक प्रशासकीय सदस्याचे संख्या वाढ करणे बाबत विविध गोसंवर्धन मागण्या करण्यात आलेसंदर्भ- सर्व गोशाळांना चारा पाण्यासाठी काहीतरी मदत चारा पाण्याची व्यवस्था होईल म्हणून प्रत्येक पालकमंत्र्यांनी विचार करून लवकर निर्णय घ्यावा



वरील विषय अनुसरून गौरक्षक सेना महाराष्ट्र - कै. छगन आप्पा जाधव गोसंवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट परभणी च्या वतीने महाराष्ट्र राज्य सरकार मधील सर्व मंत्र्यांना कॅबिनेट व राज्यमंत्र्यांना सरकारमध्ये एकूण 43 मंत्री आहेत प्रत्येक मंत्री महाराष्ट्र राज्यात 36 जिल्हे आहेत त्यामध्ये प्रत्येक जिल्ह्याचा एक पालकमंत्री असतो जर पालकमंत्री महाराष्ट्रातल्या आपुन आपल्या प्रत्येक जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांनी त्या त्या जिल्ह्याच्या पालक तत्व स्वीकारून सर्व गोशाळा जिल्ह्याच्या एका पालकमंत्र्याच्या मागे एक जिल्ह्याच्या सर्व गोशाळा दत्तक घ्यावा कारण त्यांच्या सर्व गोशाळेतील चारा पाण्याच्या व्यवस्थेसाठी नोंदणीकृत गोशाळा जर प्रत्येक पालकमंत्र्यांनी आपण आपल्या स्वतःच्या जिल्ह्यात चारा पाण्याचे व्यवस्था साठी जर दत्तक घेतल्या तर गोमाता संरक्षण गोमाता वाचल्या जाईन गोवंश जतन गोसंवर्धन गाय बैल गोहत्या होणार नाही म्हणून प्रशासनाने सर्व पालकमंत्र्यांनी एक कॅबिनेट बैठक घेऊन त्याच्यामध्ये मुख्यमंत्र्याकडे अशी मागणी घेऊन याची लवकर न्याय देण्यात यावा महाराष्ट्र सरकारने राज्य माता गोमाता हे जाहीर केले आहे पण सरकारने जर अशा पद्धतीची जिल्हा दत्तक गोशाळा दत्तक घेऊन चांगला गोशाळेसाठी निर्णय होऊ शकतो.

# तिरंगा यात्रा संपली, पण जबाबदारी संपली नाही; किशोर शितोळे यांच्या टीमने केली मार्गाची स्वच्छता

### देशभक्तीसोबत स्वच्छतेचीही जपणूक; थकवा बाजूला ठेवून कार्यकर्त्यांचा कौतुकास्पद उपक्रम

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** भव्य तिरंगा यात्रा आणि सभेचा उत्साहपूर्ण समारोप झाल्यानंतर छत्रपती संभाजीनगर शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी तिरंगा यात्रा मार्गाची स्वच्छता करून सामाजिक बांधिलकीचा आदर्श घालून दिला.

तिरंगा यात्रेत मोठ्या संख्येने नागरिक आणि कार्यकर्ते सहभागी झाल्याने यात्रा मार्गावर पाण्याच्या बाटल्या तसेच इतर कचरा निर्माण झाला होता. दिवसभराच्या धावपळीनंतर कार्यकर्ते थकलेले असतानाही त्यांनी विश्रांतीला प्राधान्य न देता स्वच्छतेची जबाबदारी स्वीकारली. सर्वांनी मिळून मार्गावरील कचरा आणि पाण्याच्या बाटल्या जमा करून परिसर स्वच्छ केला.



या स्वच्छता अभियानात किशोर शितोळे यांच्यासह मराठवाड्याचे संयोजक राहुल लोणीकर, मराठवाड्याचे सहसंयोजक नितीन काळे, शहर सरचिटणीस हर्षवर्धन कराड, नगरसेवक नंदू गवळी, किशोर मानकापे, शंकर अण्णा म्हात्रे, धनंजय कुलकर्णी, यद्रेश बसय्ये, प्रथमेश चौधरी, सचिन गुगळे, मंडळाध्यक्ष तसेच अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले.

जमा झालेला कचरा एका ठिकाणी एकत्र करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्याचे नियोजन करण्यात आले. मोठ्या कार्यक्रमानंतरही स्वच्छतेची जबाबदारी गांभीर्याने पार पाडत कार्यकर्त्यांनी नागरिकांसमोर सामाजिक जाणीवेचा आदर्श निर्माण केला.

यावेळी किशोर शितोळे म्हणाले, "तिरंगा यात्रेचा उत्साह आणि देशभक्ती जितकी महत्त्वाची आहे, तितकीच आपला परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारीही महत्त्वाची आहे. कार्यकर्त्यांनी थकवा बाजूला ठेवून स्वच्छतेसाठी घेतलेला पुढाकार निश्चितच कौतुकास्पद आहे."

देशभक्तीचा उत्सव साजरा करताना 'आपला देश, आपला परिसर आणि आपली जबाबदारी' या भावनेतून राबविण्यात आलेल्या या स्वच्छता अभियानाचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

# पर्यावरण संवर्धनाचा संकल्प; शाडू मातीच्या गणेशमूर्ती निर्मितीत 60 विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

### आदित्य थोर व पार्थ गायके यांना प्रथम पारितोषिक

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश देत 'ईको फ्रेंडली गणेशा' उपक्रमांतर्गत शाडू मातीपासून गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळा उत्साहात पार पडली. श्री गणेश साई कलासंगम आर्टच्या ३०व्या उपक्रमांतर्गत आयोजित या कार्यशाळेत सुमारे ६० विद्यार्थी व पालकांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने गणेशमूर्ती साकारत पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. यावेळी उत्कृष्ट गणेशमूर्ती साकारल्याबद्दल आदित्य थोर व पार्थ गायके यांनी प्रथम पारितोषिक पटकावले.





प्लास्टर ऑफ पॅरिसमुक्त गणेशोत्सव साजरा करण्याच्या उद्देशाने लायन्स क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर डेक्कन, देवदूत हौसिंग सोसायटी आणि बालमित्र गणेश मित्र मंडळ, बजाजनगर यांच्या संयुक्त विद्यमाने जागृत हनुमान मंदिर, आर. एक्स. बजाजनगर येथे या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी शाडू मातीपासून गणेशमूर्ती तयार करण्याची कला प्रत्यक्ष शिकून घेतली. मूर्तिकार चरण खराडे यांनी प्लास्टर ऑफ पॅरिस आणि शाडू माती यातील फरक समजावून सांगत शाडू मातीच्या गणेशमूर्ती पर्यावरणासाठी अधिक उपयुक्त असल्याचे स्पष्ट केले. गणेशोत्सवाच्या माध्यमातून निसर्ग संवर्धनाला हातभार लावण्यासाठी नागरिकांनी पर्यावरणपूरक गणेशमूर्तींची स्थापना करावी, असे आवाहन त्यांनी केले.

विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या गणेशमूर्तींचे परीक्षण करून उत्कृष्ट मूर्तींची निवड करण्यात आली. यामध्ये आदित्य थोर व पार्थ गायके यांनी प्रथम क्रमांक पटकावत प्रथम पारितोषिकाचा सन्मान मिळविला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देतानाच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

या उपक्रमाला विश्वकर्मा वंशीय समाज संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. नागोराव पांचाळ यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी लायन्स क्लबचे सचिव महेश धिमते, संचालक दशरथ मुळे, जागृत हनुमान मंदिराचे ट्रस्टी अनिल पाटील, तसेच देवदूत हौसिंग सोसायटी बालमित्र गणेश मंडळाचे अध्यक्ष ऋग्वेद तेलंग उपस्थित होते.

यावेळी जालिंदर सोनवणे, परमेश्वर पांचाळ, भगवान राऊत, चंदू हिवाळे, ज्ञानेश्वर थोर, डॉ. माके सर, वैशाली आरडे, नुतन धिमते, तांबे महाराज, संतोष तेलंग, वैभव घुले, सुप्रिया घुले, जे. टी. पवार, काळे साहेब, सीताराम जाधव, सुमित पांचाळ, सागर खराडे, प्रथमेश तायडे आणि रोहित पाटील यांचीही उपस्थिती होती.

कार्यशाळेचे प्रशिक्षण प्रमुख बालाजी पांचाळ यांनी मार्गदर्शन केले, तर मूर्तिकार चरण खराडे यांनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले. कार्यशाळेत सहभागी विद्यार्थी व पालकांनी यापुढे दरवर्षी आपल्या घरी शाडू मातीच्या गणेशमूर्तींचीच स्थापना करण्याचा संकल्प केला. पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश घराघरात पोहोचविण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजक, प्रशिक्षक, मूर्तिकार, कार्यकर्ते, विद्यार्थी व पालकांनी परिश्रम घेतले. सामाजिक कार्यात सातत्याने सक्रिय असलेले महेश धिमते यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# संपादकीय

## निसर्गाचा कोप, आव्हान

ईशान्य भारतातील निसर्गाच्या रौद्ररुपाने पुन्हा एकदा मानवी जीवनाची क्षणभंगुरता आणि पर्यावरणाच्या असंतुलनाचा गंभीर प्रश्न समोर आणला आहे. अरुणाचल प्रदेशात मुसळधार पावसामुळे आलेल्या अचानक महापुरात आणि भूस्खलनात लष्कराचे जवान आणि स्थानिक नागरिक मारले जाण्याची घटना अत्यंत वेदनादायी आहे. देशाच्या सीमांचे रक्षण करण्यासाठी दुर्गम आणि आव्हानात्मक भागात तैनात असलेल्या सैनिकांना अशा नैसर्गिक आपत्तीचा सामना करावा लागणे, हे प्रशासकीय आणि आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने मोठे आव्हान ठरत आहे. दिबांग व्हॅली जिल्ह्यात पुराच्या तावडीत सापडून लष्कराचे शेल्टर वाहून जाणे आणि त्यात जवानांचा बळी जाणे ही घटना अत्यंत धक्कादायक आहे. प्रतिकूल हवामानात आणि कठीण भौगोलिक परिस्थितीत आपले कर्तव्य बजावणाऱ्या सैनिकांना निसर्गाच्या अवकृपेचा फटका बसला आहे. शोध आणि बचाव पथके आपले कार्य करत असली, तरी डोंगराळ भागातील सातत्यपूर्ण पाऊस आणि भूस्खलनामुळे मदतकार्यात अनेक अडचणी येत आहेत. दुसरीकडे अप्पर सुबनसिरी जिल्ह्यात झालेल्या भूस्खलनात निष्पाप नागरिकांचा झालेला मृत्यू हा ईशान्येकडील राज्यांमधील पायाभूत सुविधा आणि सुरक्षा उपायांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करतो. दरडी कोसळणे आणि रस्ते खचणे या घटना या भागात वारंवार घडत असतात. त्यामुळे केवळ रस्ते बांधणे पुरेसे नसून, भूस्खलनप्रवण क्षेत्रांची अचूक ओळख पटवून तिथे खबरदारीच्या उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे बनले आहे. ईशान्य भारतातील राज्यांमध्ये पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या या आपत्तींवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी आधुनिक आपत्ती पूर्वसूचना प्रणाली आणि अधिक मजबूत पायाभूत सुविधा उभारणे काळाची गरज आहे. निसर्गाच्या या कोपापुढे मानवी प्रयत्न तोकडे पडत असले, तरी योग्य नियोजन आणि वेळेवर घेतलेली दक्षता अनेक प्राण वाचवू शकते.

## सरस्वती विद्यालय तळणी येथे स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा



हिंदूप्रकाश वार्ता वृत्तसेवा

**सिल्लोड :** देशाच्या स्वातंत्र्याचा उत्सव असलेल्या स्वातंत्र्यदिनानिमित्त सरस्वती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तळणी गावात देशभक्ती, उत्साह आणि अभिमानाचे वातावरण पाहायला मिळाले. गावातील जिल्हा परिषद विद्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी कार्यालय अशा चार ठिकाणी राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण उत्साहात करण्यात आले. सरस्वती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, सिल्लोडच्या संचालिका बी.के. छाया दीदी यांच्या हस्ते राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी बी.के. श्रद्धा दीदी, राजू भाई साळुंखे आणि बी.के. योगेश भाई देशपांडे, प्राचार्य अशोक दादा गरुड यांच्या प्रमुख उपस्थितीसह जिल्हा परिषद विद्यालय येथे शालेय समितीचे अध्यक्ष नानाभाऊ भागवत ठोंबरे यांच्या हस्ते राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. तर ग्रामपंचायत कार्यालय येथे भारतीय सैन्य दलात कार्यरत असलेले योगेश पंडीतराव वाघ यांच्या हस्ते राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. विविध कार्यकारी सेवा सोसायटी कार्यालय येथे सद्गुरु कॉम्प्युटरचे संचालक विशाल दत्तू सोनवणे यांच्या हस्ते राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन जनार्धन कुंटे तर आभार मयूर साखळे यांनी मानले. या चारही ठिकाणी झालेल्या ध्वजारोहण कार्यक्रमांना सरपंच, उपसरपंच, सोसायटीचे चेअरमन व संचालक मंडळाचे सदस्य, जिल्हा परिषद विद्यालयाचे शिक्षक, सरस्वती विद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विविध क्षेत्रातील मान्यवर, शालेय विद्यार्थी आणि बहुसंख्य ग्रामस्थ उपस्थित होते.

## संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात स्वातंत्र्यदिन साजरा



हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी

**सोयगाव, दि.१६ ऑगस्ट :** अजिंठा शिक्षण संस्थेचे संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथे भारताचा ७९ वा स्वातंत्र्यदिन अत्यंत उत्साह देशभक्ती आणि राष्ट्रीय अभिमानाच्या वातावरणात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई प्रकाश काळे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले.ध्वजारोहणानंतर उपस्थितांनी राष्ट्रध्वजाला सलामी देत देशभक्तीपर घोषणा दिल्या.

कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार,उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे,ज्ञानज्योती अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेश यादव,कै.बाबूरावजी काळे मेमोरियल स्कूलचे मुख्याध्यापक निलेश पाटील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी,विद्यार्थी,माजी विद्यार्थी तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.सुनील चौधरे,डॉ.दीपक पारधे,प्रा.शिवाजी शिरसाठ आणि सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. प्रमुख अतिथी पुष्पाताई काळे यांनी आपल्या मनोगतात स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण करून आजच्या युवकांनी राष्ट्रप्रेम,सामाजिक जबाबदारी, संविधानिक मूल्ये आणि कर्तव्यनिष्ठा जोपासावी,असे आवाहन केले. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ.शिरीष पवार यांनी भारताच्या स्वातंत्र्याचा इतिहास,स्वातंत्र्यवीरांचे बलिदान आणि विकसित भारताच्या निर्मितीत युवकांची भूमिका यावर प्रकाश टाकला.विद्यार्थ्यांनी ज्ञान,संस्कार,शिस्त आणि सामाजिक बांधिलकी यांच्या बळावर देशाच्या प्रगतीत मोलाचे योगदान द्यावे,असे त्यांनी सांगितले. यावेळी उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे यांनी स्वातंत्र्यदिनाचे महत्त्व विशद करत विद्यार्थ्यांना राष्ट्रहिताला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे आवाहन केले.देशाच्या विकासात शिक्षण,संशोधन आणि सामाजिक सहभाग यांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. यावेळी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे पुष्पाताई काळे यांच्या हस्ते महाविद्यालय परिसर मध्ये वृक्षारोपण करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक समिती सदस्य प्रा.डॉ.रमेश औताडे यांनी तर आभार प्रा.डॉ.शंतनू चव्हाण यांनी मानले

# परभणीच्या विकासाला नवी गती; शेतकरी, महिला, तरुणांच्या प्रगतीसाठी शासन कटिबद्ध : पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर

## स्वातंत्र्य दिनानिमित्त पालकमंत्री यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण संपन्न

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभण :** शेतकरी, महिला, तरुण आणि सर्वसामान्यांच्या विकासाला केंद्रस्थानी ठेवून परभणी जिल्हा विकासाच्या नव्या पर्वाकडे वाटचाल करीत आहे. शेती, उद्योग, रोजगार, आरोग्य, जलसंधारण आणि पायाभूत सुविधांना गती देऊन जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध असल्याची ग्वाही पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिली.

स्वातंत्र्य दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात मुख्य शासकीय ध्वजारोहण पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते झाले. यावेळी शुभेच्छा संदेश देताना त्या बोलत होत्या. या प्रसंगी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा लता वाकळे, महापौर सय्यद इकबाल सय्यद खाजा, आमदार राहूल पाटील, जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नतीशा माथूर, मनपा आयुक्त नितीन नार्वेकर, अपर पोलीस अधीक्षक तानाजी चिखले आदींसह ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक, पदाधिकारी, पत्रकार, नागरिक, अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर यांनी 'हर घर तिरंगा' अभियानातील सहभागाबद्दल परभणीकरांचे अभिनंदन केले. तर विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमात जिल्हा प्रशासनाने राज्यात सर्वोत्कृष्ट काम केल्याबद्दल जिल्हाधिकारी, सर्व अधिकारी, कर्मचारी यांचे अभिनंदन केले. पोलीस विभाग राबवित असलेल्या लोकाभिमुख उपक्रमाबद्दल त्यांनी पोलीस अधीक्षक व सर्व पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांही अभिनंदन केले.

यावेळी जलसंधारण सप्ताह निमित्त आयोजित "महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर" लोगोचे अनावरण पालकमंत्री यांच्या हस्ते झाले. समाजकल्याण विभागामार्फत आयोजित गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल वाटप कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले. तसेच जलसंधारण सप्ताह निमित्त आयोजित जनजागृती रथास पालकमंत्री यांनी हिरवी झेंडी दाखविली.

पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर आपल्या शुभेच्छा संदेशात, म्हणाल्या की, 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती' योजनेत जिल्ह्यातील १ लाख ६० हजार ७६९ शेतकऱ्यांना लाभ मिळणार



आहे. पहिल्या यादीतील पात्र ७९ हजार ८५५ शेतकऱ्यांसाठी ५८२ कोटी रुपयांची कर्जमाफी होणार आहे. तर राज्यस्तरावर नुकत्याच जाहीर झालेल्या पहिल्या यादीत जिल्हयातील ७ हजार ८७० शेतकऱ्यांच्या खात्यात ६० कोटी ४ लाख रुपये जमा झाले आहेत. 'मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजने'तून ९९ हजार ३५८ कृषीपंपधारकांना लाभ मिळाला असून, ६२२ कोटी ९० लाख रुपयांचे वीज बिल माफ झाले आहे. पीक विमा योजनेत ५ लाख २३ हजारांहून अधिक शेतकरी सहभागी झाले असून, ३ लाख ६१ हजार हेक्टर क्षेत्र विमा संरक्षणाखाली आले आहे.

उद्योग आणि रोजगाराला चालना देण्यासाठी 'परभणी ग्रोथ हब'अंतर्गत रविवार, दि. १६ ऑगस्ट रोजी परभणीत आयोजित जिल्हास्तरीय गुंतवणुक परिषदेच्या माध्यमातून जिल्हयात उद्योग वाढीसाठी सुमारे १,५०० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. जिल्हयात 'सिल्क अँड मिल्क' मॉडेलच्या माध्यमातून रेशीम शेती व दुग्ध व्यवसायाला चालना देण्यात येणार आहे. रोजगार मेळाव्यांमधून तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिल्या जात असून, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या माध्यमातून २ हजार ४३५ लाभार्थ्यांना ३९२ कोटी रुपयांचे कर्ज वितरित करण्यात आले आहे.

महिला सक्षमीकरणालाही प्राधान्य देण्यात येत असून, शेतीपूरक व्यवसायातील महिलांना शेतकरी म्हणून अधिकृत दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जिल्ह्यात एक लाखांहून अधिक महिला 'लखपती दीदी' झाल्या आहेत.

जलसंधारणासाठी लोकसहभागाचे आवाहन करत १५ ते २१ ऑगस्टदरम्यान जलसंधारण सप्ताह राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. २१ ऑगस्टच्या 'महा वॉकेथॉन—वॉक फॉर वॉटर'मध्ये नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

आरोग्य आणि लोकाभिमुख प्रशासनातही जिल्ह्याची कामगिरी उल्लेखनीय ठरली आहे. जिल्हा रुग्णालयाने सलग दोन वेळा राज्यात प्रथम क्रमांक मिळविला असून, कॅथलॅबचे काम पूर्ण झाले आहे आणि एमआरआय सुविधेचा सुमारे एक हजार रुग्णांनी लाभ घेतला आहे. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरातून ३० हजारांहून अधिक नागरिकांना योजनांचा लाभ मिळाला आहे.. ८५२ ग्रामपंचायतींमध्ये डिजिटल गाव नकाशे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

संत जनाबाई तीर्थक्षेत्र विकासासाठी ५० कोटी रुपये मंजूर झाले असून, सौरऊर्जा, क्रीडा, घरकुल, कौशल्य विकास आणि पायाभूत सुविधांनाही गती देण्यात येत आहे. आकांक्षित जिल्हा कार्यक्रमातून आरोग्य, शिक्षण, शेती व जलसंपदा क्षेत्रातही विकासाला चालना मिळणार आहे.

जनतेच्या सहभागातून विकसित, सक्षम आणि समृद्ध परभणी घडविण्यासाठी शासनाच्या योजना प्रभावीपणे राबवू, अशी ग्वाही पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिली.

यावेळी पालकमंत्री यांनी उपस्थितांना नशामुक्त भारत अभियानातंर्गत नशामुक्ती आणि जलसंधारण सप्ताहनिमित्त जलसंवर्धनाची शपथ दिली. यानंतर पालकमंत्री यांनी स्वातंत्र्यसैनिक, लोकप्रतिनिधी, उपस्थित नागरिकांची भेट घेऊन त्यांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमानंतर जिल्हा नियोजन सभागृहात आयोजित कार्यक्रमात पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर यांच्या हस्ते विविध विभागात उत्कृष्ट कार्य करणारे अधिकारी, कर्मचारी यांनी प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच विशेष परिक्षांमध्ये विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. वीर पत्नी / वीर माता / पिता यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक प्रवीण वायकोस यांनी केले.

# कृषि मंत्री ना. श्री. दत्तात्रय भरणे यांच्या शुभहस्ते वनामकृवित नैसर्गिक शेती व सेंद्रिय उत्पादनास चालना देण्यासाठी प्रगत कीटकनाशक तपासणी व अवशेष विश्लेषण प्रयोगशाळेचे उद्घाटन

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी** :-यानिमित्त आयोजित 'देशी गोवंश, नैसर्गिक शेती व मसाला पिके' विषयावरील परिसंवादास शेतकरी व महिला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

भारत सरकारची राष्ट्रीय कृषि विकास योजना, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी आणि महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या कीटकशास्त्र विभागात 'नैसर्गिक शेती आणि सेंद्रिय उत्पादनास प्रोत्साहन देण्यासाठी प्रगत कीटकनाशक तपासणी व अवशेष विश्लेषण प्रयोगशाळेचे' उद्घाटन तसेच 'देशी गोवंश, नैसर्गिक शेती व मसाला पिके' या विषयावरील परिसंवादाचे आयोजन स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने दिनांक १५ ऑगस्ट २०२६ रोजी करण्यात आले.

प्रयोगशाळेचे उद्घाटन आणि परिसंवादाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे माननीय कृषि मंत्री तथा विद्यापीठाचे प्रतिकुलपती मा. ना. श्री. दत्तात्रय भरणे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रमास सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणी पुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मा. ना. श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, परभणी महानगरपालिकेचे महापौर मा. श्री. सय्यद इकबाल सय्यद खाजा तसेच परभणी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष श्री. श्रीकांत विटेकर यांची विशेष उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि होते. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून विधानसभा सदस्य मा. आ. डॉ. राहुल पाटील, मा. आ. श्री. रत्नाकर गुट्टे, मा. आ. श्री. बालाजी कल्याणकर, मा. आ. श्री. राजेश विटेकर तसेच सेलू नगरपरिषदेचे अध्यक्ष श्री. मिलिंद सावंत उपस्थित होते.

यावेळी माननीय जिल्हाधिकारी श्री. संजयसिंह चव्हाण (भाप्रसे), माननीय पोलीस अधीक्षक श्री. पंकज कुमावत (भापोसे), जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नतिशा माथुर (भाप्रसे) यांच्यासह संशोधन संचालक डॉ. भगवान आसेवार, विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे, शिक्षण संचालक डॉ. बाबासाहेब ठोंबरे, कुलसचिव श्री. पुरभा काळे, विद्यापीठ अभियंता श्री. दीपक कशाळकर, लातूर विभागाचे विभागीय कृषि सहसंचालक श्री. महेशकुमार तीर्थकर, परभणी आत्माचे संचालक श्री. दौलत चव्हाण, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी श्री. भास्कर कोळेकर (परभणी), श्री. प्रदीप कच्छवे (हिंगोली) यांच्यासह विद्यापीठातील अधिकारी, शास्त्रज्ञ, कर्मचारी, विद्यार्थी, शेतकरी व महिला शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रयोगशाळेच्या उद्घाटनानंतर मान्यवरांनी विद्यापीठाच्या वनस्पती रोगशास्त्र विभागांतर्गत कार्यरत बायोमिक्स प्रयोगशाळेला तसेच अन्न तंत्र महाविद्यालयातील सामूहिक उबवणूक केंद्राला (कॉमन इन्क्युबेशन सेंटर) भेट देऊन तेथील कार्याची माहिती घेतली.

परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना राज्याचे कृषि मंत्री मा. ना. श्री. दत्तात्रय भरणे म्हणाले की, पर्जन्यमानातील अनिश्चितता आणि बदलत्या हवामान परिस्थितीमुळे शेतकऱ्यांसमोर अनेक आव्हाने निर्माण झाली असून, त्याचा शेती उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होत आहे. यामुळे शेतकऱ्यांना मदत झाली पाहिजे इतकेच नव्हे तर मदत प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचली पाहिजे, यावर त्यांनी भर दिला.

यावेळी त्यांनी महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या स्मृतींना उजाळा देत, शेतकरी म्हणून त्यांनी केलेल्या निष्ठापूर्ण कार्याचे स्मरण करून त्यांना अभिवादन केले. आपण स्वतः शेतकरी कुटुंबातून आलो असल्याने शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी अधिक प्रभावीपणे कार्य करण्याची आपली बांधिलकी असल्याचे त्यांनी नमूद केले.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाने विकसित केलेले विविध कृषि तंत्रज्ञान, आधुनिक कृषि अवजारे व यंत्रसामग्री शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त आहेत. या तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे अवलंब करून उत्पादनक्षमता तसेच शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली वर्ष २०२६ हे आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष म्हणून साजरे केले जात असताना, महाराष्ट्र शासनाने महिला शेतकऱ्यांच्या योगदानाला योग्य मान्यता देण्यासाठी



महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. महिला शेतकऱ्यांना तंत्रज्ञान, बाजारपेठ, वित्तपुरवठा आणि निर्णयप्रक्रियेत समान संधी मिळणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

महिला शेतकरी पहाटेपासून शेतात कष्ट करण्यासोबतच कुटुंबातील जबाबदाऱ्याही समर्थपणे पार पाडतात. त्यांच्या या योगदानाचा सन्मान होणे आवश्यक आहे. महिला सक्षम झाल्यास कुटुंबाबरोबरच समाजाची प्रगतीही अधिक वेगाने होते, असेही माननीय कृषि मंत्री श्री. भरणे यांनी नमूद केले.

शेतकऱ्यांच्या हितासाठी शासनाने कर्जमाफीसह विविध महत्त्वपूर्ण निर्णय घेतले असून, शेतीचे आरोग्य सुधारण्यासाठी रासायनिक निविष्ठांचा अनावश्यक वापर कमी करून सेंद्रिय निविष्ठांचा वापर वाढविणे गरजेचे आहे. नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देत शाश्वत शेतीच्या दिशेने वाटचाल करणे ही काळाची गरज आहे, असे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या मोफत वीज योजनेची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठात स्थापन करण्यात आलेल्या प्रगत कीटकनाशक तपासणी व अवशेष विश्लेषण प्रयोगशाळेच्या माध्यमातून शेतमालातील कीटकनाशक अवशेषांची तपासणी करणे, सुरक्षित अन्न उत्पादनाला चालना देणे तसेच नैसर्गिक व सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देणे शक्य होणार आहे. ही प्रयोगशाळा शेतकरी, ग्राहक आणि संपूर्ण कृषि क्षेत्राच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शेतकऱ्यांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून आनंदी व प्रसन्न जीवन जगावे. सर्वांसोबत आपुलकीचे संबंध जपावेत, असे आवाहन करताना त्यांनी उपस्थितांना आनंद द्यावा आणि आनंद घ्यावा असा संदेश दिला. कृषि शिक्षण घेणारे विद्यार्थी, शेतकरी आणि संपूर्ण कृषि क्षेत्राच्या कल्याणासाठी शासनाच्या माध्यमातून सातत्याने कार्य करण्याची ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.

विद्यार्थ्यांशी साधला संवाद

कार्यक्रमानंतर माननीय कृषि मंत्री ना. श्री. दत्तात्रय भरणे यांनी विद्यापीठातील कृषि व संलग्न शाखांमधील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांच्या अडचणी व अपेक्षा जाणून घेतल्या. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, "शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी कठोर मेहनत घ्या, प्रामाणिकपणे कार्य करा, नीती-मूल्यांचे पालन करा आणि आई-वडिलांचा सन्मान करा." कृषि शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी भविष्यातील कृषि क्षेत्राच्या विकासासाठी ज्ञान, तंत्रज्ञान आणि मूल्यांची सांगड घालत कार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

माननीय पालकमंत्री ना. श्रीमती मेघना साकोरे- बोर्डीकर म्हणाल्या की, भारताचे पंतप्रधान माननीय श्री नरेंद्र मोदी जी यांच्या आत्मनिर्भर भारताच्या संकल्पनेतून केंद्र शासनाने शेतकरी कल्याणासाठी विविध योजना राबविल्या जात असून, त्यातून शेतकऱ्यांचा आत्मसन्मान वाढण्यास मदत झाली आहे. महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणवीस जी, यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्ज मुक्त योजना आणली असून, शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज घेण्याची गरज पडू नये, या उद्देशाने शासन कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांच्या वीज थकबाकीबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयांचाही त्यांनी उल्लेख केला. जागतिक महिला वर्षाच्या निमित्ताने महिला शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबविण्यात येत असून, त्यांना समाजात योग्य ओळख आणि सन्मान मिळावा यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

आपण स्वतः सेंद्रिय शेती पद्धतीचा अवलंब करत असल्याचे सांगत सेंद्रिय व नैसर्गिक शेती ही काळाची गरज झाली आहे, त्यामुळे विद्यापीठाने आयोजित केलेला हा परिसंवाद अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी नमूद केले. परिसंवादातून मिळणारे ज्ञान शेतकऱ्यांनी आत्मसात करून प्रत्यक्ष शेतीमध्ये त्याचा उपयोग करावा, असे आवाहन त्यांनी केले.

शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी प्रत्येकी पाच शेतकरी दत्तक घेऊन त्यांना मार्गदर्शन करण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार शास्त्रज्ञांनी कार्य पूर्ण करून शाश्वत शेतीला चालना दिल्याचे त्यांनी सांगितले.

पश्चिम महाराष्ट्रातील प्रगत शेतीचे उदाहरण दिले जाते; त्याच धर्तीवर परभणी आणि मराठवाड्यातही प्रगत व फायदेशीर शेती विकसित व्हावी यासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. 'सिल्क अँड मिल्क' तसेच कृषि प्रक्रिया उद्योगांना चालना देण्यासाठी पुढाकार घेतला जात असून, या योजना मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण महाराष्ट्रात राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कृषि प्रक्रिया उद्योगांना चालना देणे ही आपली जबाबदारी समजून आपण सातत्याने प्रयत्न करणार असून, माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी जी यांच्या आत्मनिर्भर भारताच्या संकल्पनेला बळ देण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी त्यांनी माननीय कुलगुरू प्रा.(डॉ.) इन्द्र मणि यांच्या नेतृत्वाखाली मराठवाड्यातील शेतीच्या विकासासाठी विद्यापीठाकडून प्रामाणिकपणे प्रयत्न सुरू असल्याचे नमूद केले. विद्यापीठातील संशोधन, तंत्रज्ञान आणि ज्ञानाचा प्रत्यक्ष लाभ मराठवाड्यातील शेतकऱ्यांना मिळाला पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. आजच्या कार्यक्रमात महिला शेतकरी आणि महिलांचा उत्स्फूर्त सहभाग उल्लेखनीय असल्याचे नमूद करून, विद्यापीठाच्या प्रशिक्षण व विस्तार उपक्रमांमुळे महिला शेतकरी आणि विद्यापीठ यांच्यातील संपर्क अधिक दृढ होत असल्याचे त्यांनी कौतुकाने सांगितले.

स्वागतपर भाषणात माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी माननीय कृषि मंत्री ना. श्री. दत्तात्रय भरणे यांनी शेतकरी, विद्यार्थी आणि विद्यापीठाच्या कल्याणासाठी केलेल्या कार्याबद्दल तसेच विद्यापीठास आवर्जून भेट देऊन विविध उपक्रमांची पाहणी केल्याबद्दल त्यांचे आभार मानले. माननीय पालकमंत्री ना. श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर तसेच उपस्थित सर्व मान्यवरांचेही त्यांनी स्वागत व आभार मानले.

यावेळी माननीय कुलगुरूंनी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या स्थापनेपासूनच्या वाटचालीचा आढावा घेत विद्यापीठाने शिक्षण, संशोधन आणि विस्तार शिक्षण क्षेत्रात मिळविलेल्या उल्लेखनीय यशाची माहिती दिली.

नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकास, उद्योजकता आणि नवोपक्रमाची क्षमता विकसित करण्यावर विद्यापीठाचा भर असल्याचे त्यांनी सांगितले. संशोधन क्षेत्रातही विद्यापीठाने उल्लेखनीय कामगिरी केली असून, विद्यापीठाच्या २५ अखिल भारतीय समन्वित संशोधन प्रकल्पांपैकी १० संशोधन केंद्रांनी देशपातळीवर अव्वल स्थान मिळविले असल्याचे त्यांनी नमूद केले.

'शेतकरी देवो भव' या भावनेतून विद्यापीठाच्या वतीने शेतकऱ्यांसाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. 'माझा एक दिवस माझ्या बळीराजासोबत' या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यापीठातील शास्त्रज्ञ थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन मार्गदर्शन करीत आहेत. तसेच दर मंगळवार आणि शुक्रवार सायंकाळी ७ ते ९ या वेळेत ऑनलाइन 'शेतकरी-शास्त्रज्ञ संवाद' आयोजित करण्यात येत असून, त्यातून शेतकरी-शेतकरी आणि शेतकरी-शास्त्रज्ञ यांच्यातील संवादाच्या माध्यमातून कृषि तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविले जात आहे.

माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस जी यांच्या निर्देशानुसार विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात ११ प्रगतिशील शेतकऱ्यांना 'शेतकरी शास्त्रज्ञ' म्हणून सन्मानित करण्यात आले असून, पद्मश्री माननीय श्री दादा लाड यांना डी.एस्सी. पदवी देऊन गौरविण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

# पालकमंत्री संजय शिरसाटांच्या हस्ते छत्रपती संभाजीनगरमध्ये 80 वा स्वातंत्र्य दिन साजरा

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

विविधतेने नटलेला आपला देश एकसंघ ठेवण्यात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या राज्यघटनेचे मोठे योगदान आहे. जिल्ह्याचा विकास करत असताना समाजातील सर्वसामान्य माणूस हाच विकासाचा खरा केंद्रबिंदू असून, सर्वांनी एकत्र येऊन विकास प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी केले.

देशाचा ८० वा स्वातंत्र्य दिन आज जिल्ह्यात अत्यंत उत्साहात आणि चैतन्यमय वातावरणात साजरा करण्यात आला. जिल्ह्याचा मुख्य शासकीय सोहळा विभागीय आयुक्त कार्यालयाच्या प्रांगणात दिमाखात पार पडला. प्रारंभी 'वंदे मातरम्' गायनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते राष्ट्रध्वजारोहण करण्यात आले. पोलीस वाद्यवृंदाच्या तालावर राष्ट्रगीत होऊन राष्ट्रध्वजास मानवंदना देण्यात आली, तसेच यानंतर राज्यगीत सादर झाले.

आपल्या सविस्तर संबोधनात पालकमंत्री शिरसाट यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी अहोरात्र लढा देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांच्या त्याग व बलिदानाचे स्मरण करून हुतात्म्यांना आदरांजली वाहिली. ते म्हणाले की, देशाचा स्वातंत्र्य दिन साजरा होत असताना या आनंदात प्रत्येक देशवासी समरस झाला आहे. आपापसातले सगळे भेद विसरून सर्व जाती-धर्माचे लोक एकत्रितपणे स्वातंत्र्याचा आनंद घेत आहेत, हे आपल्या देशाचे ठळक वैशिष्ट्य आहे. आपल्या सगळ्यांसाठी भारताची राज्यघटना ही सर्वोपरी असून, पूर्वजांच्या बलिदानामुळेच आज आपण स्वातंत्र्याचा अनुभव घेत आहोत, याची जाणिव प्रत्येक नागरिकाने ठेवली पाहिजे.

शासनाच्या धोरणांवर प्रकाश टाकताना ते पुढे म्हणाले की, आपले राज्य प्रगतीपथावर वाटचाल करत असताना शासनाचा केंद्रबिंदू



नेहमीच सर्वसामान्य नागरिक राहिला आहे. विकास करत असताना तो समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचला पाहिजे, हेच शासनाचे मुख्य धोरण आहे. सर्वांच्या सहभागातूनच आपण देशाचा आणि जिल्ह्याचा विकास साधू शकतो. यावेळी त्यांनी जिल्ह्यात शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनांचा आढावा घेतला. तसेच घाटी रुग्णालयाला सुपर स्पेशालिटी रुग्णालय म्हणून विकसित करण्याचा दृढ संकल्प, खेळाडूंसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधांची निर्मिती आणि शहरासाठी अत्याधुनिक अग्निशामक दल उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे मनोगतात स्पष्ट केले.

या मुख्य शासकीय सोहळ्यास विधानपरिषदेचे सदस्य आ. अंबादास दानवे, माजी खासदार चंद्रकांत खैरे, विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी., मनपा आयुक्त अमोल येडगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम., छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, जिल्हा पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी, स्वातंत्र्य सैनिक, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्य सोहळ्यानंतर विविधलोकोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पालकमंत्री संजय शिरसाट यांनी उपस्थितांना जलसंधारणाची विशेष शपथ दिली आणि जलसंधारण सप्ताहाच्या अधिकृत लोगोचे अनावरण केले. याशिवाय, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका तसेच कन्नड, पैठण, सोयगाव, वैजापूर, फुलंब्री आणि गंगापूर या नगरपालिकांसाठी सात नवीन जेटींग स्वच्छता वाहनांचे लोकार्पण पालकमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर विभागीय आयुक्त कार्यालयातील नूतनीकृत दालन व कक्षांचे उद्‌घाटन करून त्यांनी कार्यालयाची पाहणी केली आणि मराठवाडा मुक्ती संग्राम स्मारकाच्या सुरू असलेल्या बांधकामाचा सविस्तर आढावाही घेतला.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात उत्कृष्ट व उल्लेखनीय सेवा बजावणाऱ्या अधिकारी व पोलीस कर्मचाऱ्यांना विशेष पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. यामध्ये पोलीस उत्कृष्ट सेवा पदक छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र, पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, अपर पोलीस अधीक्षक शशिकांत शिंगारे आणि पोलीस उपायुक्त शशिकांत सातव यांना प्रदान करण्यात आले. तसेच, अति उत्कृष्ट सेवा पदक प्राप्त करणाऱ्यांमध्ये सुभाष भुजंग, सिल्लोडचे उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वजीत काईगडे, अविनाश आघाव, अमोल देशमुख, अविनाश बागुल, रफिक पठाण, किरण गावंडे, इम्तियाज अहमद, विठ्ठल राख, प्रदीप धनवे, बाळू थोरात, आत्माराम पैठणकर, देविसिंग ठाकूर, शिरीष वाघ आणि विनोद आघाव यांचा गौरव करण्यात आला. सोहळा संपन्न झाल्यानंतर पालकमंत्र्यांनी उपस्थित स्वातंत्र्य सैनिक, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना स्वातंत्र्यदिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

## विद्यापीठात मा.कुलगुरु यांच्या हस्ते ध्वजारोहण

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

मुख्य ईमारतीसमोरील हिरवळीवर शनिवारी (दि.१५) सकाळी आठ वाजता हा कार्यक्रम झाला. यावेळी कुलसचिव डॉ.प्रशांत अमृतकर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच अधिष्ठाता, संवैधानिक



अधिकारी, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी यांची यावेळी उपस्थितीही होती. या सोहळ्याचे संचालन सुरक्षा अधिकारी बाळू इंगळे यांनी केले. तर सूत्रसंचालन विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ.कैलास अंभुरे यांनी केले, दरम्यान, पैठण येथील संतपीठ येथे प्रकुलगुरू तथा समन्वयक डॉ .प्रवीण वक्ते यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

## स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण कार्यक्रम उत्साहात साजरा

हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी

सोयगाव,दि.१६ ऑगस्ट

स्वातंत्र्य दिनानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे उत्साहपूर्ण वातावरणात ध्वजारोहण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.त्यानंतर विद्यार्थ्यांनी संगीत कवायत सादरीकरण,राष्ट्रगीत व देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण केले. यावेळी विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व सांगणारी भाषणे केली.शिक्षकांनी स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाची माहिती देत



विद्यार्थ्यांना देशप्रेम,राष्ट्रीय एकात्मता आणि जबाबदार नागरिकत्वाचा संदेश दिला.

तसेच समाजसेवक लताबाई कांबळे यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना कैं. सिद्धार्थ कांबळे यांच्या स्मृतीभेट शाळेत लेखनासाठी वह्या वाटप करण्यात आल्या. यावेळी माजी विद्यार्थी संघ अध्यक्ष राजू माळी, शंकर जेठे,शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष कडुबा सपकाळ,एकनाथ इंगळे,विद्यार्थी,पालक प्रतिष्ठित नागरिक तसेच मुख्याध्यापक रघुनाथ काटोले व गोपाल चौधरी हे उपस्थित होते.

## ज्ञान संदीप विद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा: देशभक्तीपर कार्यक्रमांनी जिंकली मने

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

ज्ञान संदीप शिक्षण संस्था संचलित ज्ञान संदीप प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, मिसरवाडी, छत्रपती संभाजीनगर येथे भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात, आनंदात व देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माननीय प्रकाश सोनवणे सर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक अभिजीत सोनवणे सर उपस्थित होते. तसेच पालक प्रतिनिधी महेक



नदीम शहा, शमा निलेश वाघ, हमीद शहा तसेच मिसरवाडी वॉर्डातील अनेक पालकांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

स्वातंत्र्यदिनानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तीपर गीते, नृत्य, सांस्कृतिक कार्यक्रम व इतर कलाविष्कार सादर करून आपल्या अंगी असलेले कलागुण दाखवून उपस्थित पालकांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त आणि आकर्षक सादरीकरणामुळे संपूर्ण कार्यक्रमाला विशेष रंगत आली. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व, स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान तसेच देशाप्रती असलेली आपली कर्तव्ये याबाबत प्रभावी भाषणे करून आपले मनोगत व्यक्त केले. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून शाळेत भित्तीपत्रक स्पर्धा, चित्रकला स्पर्धा व गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माननीय प्रकाश सोनवणे सर यांच्या हस्ते सन्मानपत्र व बक्षीस देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आनंद सातदिवे सर यांनी प्रभावीपणे केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वैशाली बोरुडे, हर्षला विजय खिल्लारे, किरणकुमार सोनवणे, स्वामी जाधव, अजयकुमार खिल्लारे, गौतम मकसरे, विजय आघाव, नय्युम शेख आणि ताहेरा पठाण यांनी विशेष परिश्रम घेतले.

शेवटी शाळेच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आनंदोत्सव साजरा करत स्वातंत्र्य दिनाचा उत्साह द्विगुणित केला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी उपस्थित सर्व पालक, विद्यार्थी व सहकाऱ्यांचे सहशिक्षिका हर्षला विजय खिल्लारे यांनी आभार मानले.

## स्वातंत्र्य दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात ध्वजारोहण

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : देशाच्या 80 व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या हस्ते आज ध्वजारोहण करण्यात आले. पोलीस वाद्यवृंदाच्या तालावर राष्ट्रध्वजास मानवंदना देण्यात आली. अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) संगिता राठोड, उपजिल्हाधिकारी (राजशिष्टाचार) संगीता सानप,



उपजिल्हाधिकारी (रोहोयो) रुपेश शिंगारे, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, अपर तहसिलदार उमेश पाटील, तहसिलदार पल्लवी लिगदे, रुपा चित्रक यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी –कर्मचारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.यांनी उपस्थित सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांना भेटून शुभेच्छा दिल्या.

## धानोरा (ज.) येथे स्वातंत्र दिनी सरपंच सौ.सविता शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण

**हिंगोली** : भारतीय स्वातंत्र्य त्यांच्या दिनानिमित्त दिनांक १५ ऑगस्ट २०२६ रोजी धानोरा (ज.) ता.कळमनुरी जि.हिंगोली येथील ग्रामपंचायत कार्यालयात *सरपंच सौ.सविता रवी शिंदे* यांच्या हस्ते ध्वजारोहण करून राष्ट्रपिता महात्मा गांधी भारतीय संविधानाची शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर शहीद-ए-आजम भगतसिंग यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी *ॲड.रवि शिंदे,* उपसरपंच टोपाजी पोटे,चेअरमन बंडू कोरडे,तंटामुक्त अध्यक्ष प्रफुल पाईकराव,पोलीस पाटील विश्वनाथ जाधव,बाबुराव मस्के,राजाराम पोटे,मुंजाजी बर्गे,मोतीराम



मोरे,सुदाम पाईकराव,भीमराव डोंगरे,रामा पोटे,गजानन पोले,सुभाष सरडे,निसारखॉं पठाण,भीमराव पाईकराव,पांडुरंग पोटे,कैलास सापनार,प्रकाश धबाले ,सुभाष सापनार,बाबुराव डोंगरे,धोंडबा पाईकराव,बबन दांडेकर,दिनकर पाईकराव,रमेश पाईकराव,सुरेश पाईकराव,रियाज पठाण,इम्रान पठाण,संभाजी पोटे,सलीम पठाण,देविदास शेंबडे सुहास मस्के,शुभम सापनर, भगवान पोटे, प्रदीप बरडे,बब्बू सपनार,विजय डोंगरे,बाळू पोटे, पांडुरंग खुडे, शैलेश चिरमाडे, नामदेव खुडे, संतोष खुडे, शेकुराव पोटे,धम्मा डोंगरे,राहुल बरडे,विठ्ठल भागवतकर,गौतम धबाले,आकाश पाईकराव,प्रवीण पाईकराव, शिक्षक श्री.भुरके,श्री.मगरे अंगणवाडी कर्मचारी फमीना बेगम, द्रोपदा खुडे,सौ.शोभा चिरमाडे,सौ. नाजुका डोंगरे,रोजगार सेवक सुनील पाईकराव, ग्रा.प.सेवक संभा पोटे,संतोष चिरमाडे यांच्यासह शाळकरी विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सम्राट अशोक विद्यालयात 80 वा स्वातंत्र्यदिन देशभक्तीमय वातावरणात संपन्न

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी पर्वाच्या मालिकेत देशाचा ८० वा स्वातंत्र्यदिन छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील ब्रिजवाडी येथील सम्राट अशोक विद्यालया मध्ये अत्यंत उत्साहात, चैतन्यात आणि देशभक्तीच्या भारावलेल्या वातावरणात साजरा करण्यात आला. या महत्त्वपूर्ण राष्ट्रीय सोहळ्याने संपूर्ण परिसर देशप्रेमाच्या रंगात न्हाऊन निघाला होता.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ठीक ठरलेल्या वेळी राष्ट्रगीताच्या जयघोषात झाली. संस्थेचे अध्यक्ष मधुकरराव भोळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी ‘भारत माता की जय’ आणि ‘वंदे मातरम्’च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. राष्ट्रध्वजाला सलामी दिल्यानंतर उपस्थितांनी संविधानाच्या उद्देशिकेचे



स्मरण केले.

या सोहळ्याला परिसरातील अनेक मान्यवर आवर्जून उपस्थित होते. यामध्ये माजी नगरसेवक भगवान रगडे, कुंडलिक हिवराळे, दामू पटेकर, दामू जाधव, विश्वनाथ जिने, अजीम शेख आणि अश्रफ शेख आदी प्रमुख पाहुण्यांचा समावेश होता.

ध्वजारोहणानंतर विद्यार्थ्यांसाठी व उपस्थितांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या शिस्तबद्ध कवायती उपस्थितांचे मुख्य आकर्षण ठरल्या. याशिवाय, स्वातंत्र्यलढ्यातील थोरा-मोठ्यांच्या कार्याची माहिती देणारी ओघवत्या भाषेतील देशभक्तीपर भाषणे आणि विविध सांस्कृतिक गीतांवर सादर झालेली नृत्य सादरिकरणाने उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांमधील हा देशप्रेम आणि उत्साह पाहून उपस्थित पालक व ग्रामस्थ भारावून गेले. कार्यक्रमास पालकांची आणि नागरिकांची मोठ्या प्रमाणावर लक्षणीय उपस्थिती पाहायला मिळाली.

कार्यक्रमाचे नेटके, आकर्षक आणि प्रासंगिक सूत्रसंचालन सहशिक्षिका अस्मिता देशमुख यांनी केले, तर उपस्थितांचे आभार शोभा नवल यांनी मानले.

हा स्वातंत्र्यदिन सोहळा यशस्वी आणि अतिशय नियोजनबद्ध पार पाडण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक पी. जे. देशमुख, पर्यवेक्षक किरण भोळे, प्रीती जाधव, डी. के. अंभोरे आणि शिवाजी शिरसाट यांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी मिठाई वाटप करून व राष्ट्रगीताने या प्रेरणादायी व ऐतिहासिक सोहळ्याची राजस व मंगलमय सांगता झाली.

## जि.प.केंद्रीय उर्दू प्राथमिक शाळा शिवना येथे ध्वजारोहण व सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात संपन्न



**शिवना** : स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने जिल्हा परिषद केंद्रीय उर्दू प्राथमिक शाळा, शिवना येथे विविध कार्यक्रमांचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. सकाळी शाळेच्या प्रांगणात केंद्रप्रमुख श्री. सावळे सर यांच्या हस्ते राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री. मोहम्मद सादी सर, शाळेतील सर्व शिक्षकवृंद, विद्यार्थी तसेच गावातील मान्यवर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तिपर गीते, भाषणे व सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी आपल्या सादरीकरणातून देशप्रेम, राष्ट्रभक्ती आणि स्वातंत्र्याच्या मूल्यांचा सुंदर संदेश दिला.

विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण शाळेचे वातावरण देशभक्तीच्या भावनेने भारावून गेले होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक, शिक्षकवृंद आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. तसेच शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री इमरान कुरैशी उपाध्यक्ष श्री शेख अखलाक व सर्व सदस्य या कार्यक्रमात उपस्थित होते. व गावातील मान्यवर ही या कार्यक्रमात उपस्थित होते

## भारतमातेचे प्रतिमेचे पूजन करुन स्वातंत्र्य दिन साजरा



हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी** :-गौरक्षक सेना महाराष्ट्र व सप्तश्रृंगी पान मंदिर परभणी यांच्या संयुक्त विद्यमानाने भारतीय स्वातंत्र्य दिन 15 ऑगस्ट च्या निमित्ताने भारत मातेचे प्रतिमेचे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज प्रतिमेचे आणि भारतीय घटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर प्रतिमेचे महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून भारतीय ध्वज पूजन झेंडावंदन साजरा करण्यात आला दिनांक 15 ऑगस्ट 2026 रोजी सकाळी साडेसात वाजता सप्तश्रृंगी पान मंदिर वसमत रोड परभणी हर घर तिरंगा हर घर ध्वज हर तिरंगा गोशाळा कार्यालय अभियान प्रतिसाद म्हणून गौरक्षक सेना या संघटनेच्या वतीने भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला या कार्यक्रमाचे उद्‌घाटक गौरक्षक सेना महाराष्ट्र मराठवाड्याचे विभागाचे वरिष्ठ उपाध्यक्षश्री श्री 1008 महामंडलेश्वर डॉ. सचितानंद सरस्वती स्वामी अशोक महाराज पवार अध्यक्षस्थानी समाजसेवक सामाजिक कार्यकर्ते अंगतराव अंभोरे पाटील प्रमुख पाहुणे गोमाता दूध उत्पादक विक्रेते गोपालक नामदेव वाघ पाटील कार्यक्रमाचे आयोजक गौरक्षक सेना महाराष्ट्र प्रदेश संघटन मंत्री गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर, कार्यक्रमाचे संयोजक निमंत्रक गौरक्षक सेना महाराष्ट्र मराठवाडा विभागाचे प्रचारक तथा सप्तश्रृंगी पान मंदिर चे संचालक गो प्रेमी चंपालाल देवतवाल ठाकूर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक मागील 30 ते 35 वर्षापासून भारतीय स्वातंत्र्य दिन साजरा करतात.

## तडवी भिल आदिवासी आश्रम शाळा, येथे स्वातंत्र्य दिन साजरा



**शिवना फाटा (ता. सिल्लोड):** तडवी भिल आदिवासी अनुदानित आश्रम शाळा, शिवना फाटा, जळकी बाजार येथे 15 ऑगस्ट स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात व देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहणाने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी गावातून भव्य प्रभातफेरी (रॅली) काढून देशभक्तीपर घोषणा दिल्या. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, भाषणे व विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली आणि कार्यक्रमाची शोभा वाढवली.

या कार्यक्रमास जनप्रतिनिधी, पालक, सामाजिक कार्यकर्ते, नागरिक व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**प्रमुख उपस्थिती:** श्री. राजू बाबा काळे, श्री. शेख सलीम शेख भिकन (पं. स. सदस्य), डॉ. सलमान खान सिकंदर खान पठाण (प्रभारी सरपंच, ग्रामपंचायत शिवना), श्री. मुरलीधरराव रंगनाथराव काळे (राव काका), श्री. संदीप एकनाथ राऊत (उर्फ पप्पू सेठ, उपसभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, सिल्लोड), मा. जि. प. सदस्य श्री. इस्माईल कुरेशी, मा. सरपंच श्री. नाना भिका काळे, श्री. श्यामराव रानोबा काटे, श्री. गणेश बाबुराव काळे, श्री. नाना तोतराम केळोदे, श्री. उत्तम देवराव दहितकर, श्री. बाबुराव किसनराव भागवत, श्री. कदीर आबा, श्री. ताजू शेठ, श्री. रब्बानी शेठ तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून देशप्रेम, शिस्त व राष्ट्रसेवेचा संदेश दिला.

# उरणच्या प्रियांशी पाटीलची आंतरराष्ट्रीय भरारी; सलग दोन वर्षे 'एशियन मेडलिस्ट'चा मान

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण /रायगड :** उरण बोरी येथील रोटरी इंग्लिश मीडियम हायस्कूलमध्ये इयत्ता नववीत शिक्षण घेणाऱ्या अवघ्या १४ वर्षीय प्रियांशी मयूर पाटील हिने विंडसर्फिंग क्रीडा प्रकारात उल्लेखनीय कामगिरी करत उरणसह रायगड आणि महाराष्ट्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर सातत्यपूर्ण कामगिरी करत प्रियांशीने सलग दुसऱ्या वर्षी 'एशियन मेडलिस्ट'चा मान मिळवला आहे.

प्रियांशीने २०२५-२६ या कालावधीत टेक्नो २९३ गट १५ आणि गट १७ गर्ल्स विभागात तब्बल १४ राष्ट्रीय आणि ३ आंतरराष्ट्रीय पदके मिळवत आपल्या क्रीडा कारकिर्दीची दमदार छाप उमटवली आहे. ती याचबरोबर याटिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या माध्यमातून विंडसर्फिंगमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करत आहे.

२०२५ मध्ये सिंगापूर येथे झालेल्या इंटरनॅशनल ओपन विंडसर्फिंग चॅम्पियनशिपमध्ये कांस्यपदक, त्यानंतर नोव्हेंबर २०२५ मध्ये थायलंड येथे झालेल्या एशियन चॅम्पियनशिपमध्ये रौप्यपदक पटकावत प्रियंशीने आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली क्षमता सिद्ध केली.

एवढ्यावरच न थांबता एप्रिल २०२६ मध्ये झालेल्या विंडसर्फिंग वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये टॉप-१० मध्ये स्थान मिळवत तिने पुन्हा एकदा आपल्या आंतरराष्ट्रीय दर्जाची प्रचिती दिली. त्यानंतर जुलै २०२६ मध्ये पोलंड येथे झालेल्या युरोपियन चॅम्पियनशिपमध्येही सहभाग नोंदवला.

दरम्यान, ४ ते ८ ऑगस्ट २०२६ दरम्यान मलेशिया येथे झालेल्या एशियन



चॅम्पियनशिपमध्ये प्रियांशीने चुरशीच्या शर्यतीत दमदार कामगिरी करत कांस्यपदक पटकावले. या कामगिरीमुळे २०२५ आणि २०२६ अशी सलग दोन वर्षे आशियाई स्तरावर पदक मिळवणाऱ्या महाराष्ट्रातील कमी वयाच्या खेळाडूंमध्ये तिच्या नावाची विशेष नोंद झाली आहे.

अत्यंत कमी वयात राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर सातत्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या प्रियांशीच्या यशाचे उरण परिसरासह महाराष्ट्रातून कौतुक होत आहे. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे कुटुंबीय, शाळा, क्रीडा क्षेत्र आणि संपूर्ण परिसराचा गौरव वाढला असून भारताचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर उंचावले आहे.विशेष म्हणजे कोणतेही प्रशिक्षक नसताना केवळ आई वडिलांच्या मार्गदर्शनाखाली तिने हे यश मिळविले आहे.प्रियंशीच्या पुढील आंतरराष्ट्रीय वाटचालीसाठी क्रीडाप्रेमी, शिक्षक, पालक आणि नागरिकांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. भविष्यात प्रियांशीने भारतासाठी आणखी मोठी पदके जिंकावीत आणि देशाचा तिरंगा आंतरराष्ट्रीय क्रीडा मंचावर अभिमानाने फडकवावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# तहसीलदार मनीषा मेने यांच्या हस्ते पर्यवेक्षक तथा केंद्रप्रमुख फिरोज तडवी यांचा सत्कार



हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव,दि.१६ ऑगस्ट :** तहसीलदार कार्यालय सोयगाव येथे स्वातंत्र्य दिनाच्या सोहळ्यात SIR कार्यात सिल्लोड-सोयगाव विधानसभा मतदार संघातील सोयगाव तालुक्यात उत्कृष्ट पर्यवेक्षक म्हणून तहसीलदार मनीषा मेने यांच्या हस्ते फिरोज तडवी पर्यवेक्षक तथा केंद्रप्रमुख सोयगाव यांचा सत्कार करण्यात आला.त्यांच्या सोबत सोयगाव शहरातील BLO यांनीही उत्कृष्ट कार्य केले म्हणून विजय पाटील व सुनीता काकडे यांचाही सत्कार करण्यात आला.त्याप्रसंगी जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई काळे,नगराध्यक्षा आशाबी तडवी,सभापती उत्तम चव्हाण, पंचायत समिती सदस्या सविता गव्हाडे, गटविकास अधिकारी यमुलवाड, नगरपंचायतचे मुख्य अधिकारी संभाजी देशमुख, राहुल पत्रिके,साळवे, नायब तहसीलदार सोयगाव, सर्वपक्षीय पदाधिकारी, कार्यकर्ते,नागरिक व सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# पंचरत्न इंग्लिश मीडियम स्कूल, पिरकोनच्या विद्यार्थ्याची शिष्यवृत्ती परीक्षेत उच्च भरारी

## उरण तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावून शाळेचा नावलौकिक वाढविला

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण /रायगड :** रयत शिक्षण संस्थेच्या पंचरत्न इंग्लिश मीडियम स्कूल, पिरकोन या शाळेने शैक्षणिक क्षेत्रात आणखी एक मानाचा टप्पा गाठला आहे. शाळेचा गुणवंत विद्यार्थी कु. विधेश सदाशिव जोशी याने उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत २३८ गुण मिळवून उरण (ग्रामीण) तालुक्यात प्रथम क्रमांक व रायगड जिल्ह्यातील गुणवत्ता यादीत सातवा क्रमांक पटकवून त्याने बहुमान मिळविलेला आहे.

आपल्या चिकाटी, मेहनत, सातत्यपूर्ण अभ्यास, पालकांनी घेतलेले कष्ट आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाच्या जोरावर विधेशने हे नेत्रदीपक यश संपादन केले. त्याच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला असून, शाळेचा नावलौकिक उंचावला आहे.



या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेच्या वतीने विधेशचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले. विद्यार्थ्याच्या या यशामध्ये त्याचे पालक, मुख्याध्यापिका, शिक्षकवृंद आणि शाळेचे मार्गदर्शन यांचा मोलाचा वाटा आहे.

विधेशच्या या उत्तुंग यशाबद्दल रयत शिक्षण संस्था, रायगड विभागाचे विभागीय अधिकारी एम. के. कोंगेरे, विभागीय अधिकारी व्ही. यू. जगताप, स्थानिक स्कूल समितीचे ज्येष्ठ सदस्य रमाकांत गावंड, अनंत हरिश्चंद्र गावंड, आनंत नारायण गावंड, शाळा सल्लागार समितीचे सर्व सदस्य, मुख्याध्यापिका निकिता गायकवाड तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्याचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

विधेशच्या या उत्तुंग भरारीबद्दल सर्व स्तरांतून कौतुकाचा वर्षाव होत असून, त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी सर्वांनी शुभेच्छा दिले आहेत.

# 15 ऑगस्ट रोजीचे उपोषण पूढे ढकलले; नवीन शेवा व शेवा कोळीवाडा गावच्या आक्रमकतेपुढे प्रशासन नरमले

## विविध समस्यावर सकारात्मक चर्चा; प्रशासनाकडून आश्वासन मिळाल्याने उपोषण तात्पुरते स्थगित

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण /रायगड :** नविन शेवा व शेवा कोळीवाडा (हनुमान कोळीवाडा )ह्या दोन्ही गावांनी १५ ऑगस्ट २०२६ रोजी जो उपोषण व आंदोलन करणार होते ज्यामध्ये शेवा व कोळीवाडा गावठाण जमीन आजतागायत संपादित नसताना दि.१७/०२/१९९० व दि.१७/०३/१९९० रोजीची २ खोटे आज्ञापत्रे बनवले आहेत ते रद्द करण्याबाबत व गेली ४० वर्षे दोन्ही गावांची पुनर्वसनाची जी फसवणूक व ठकवणे होत आहे त्या विरोधात आवाज उठविण्यासाठी व पुनर्वसनाची पूर्तता करण्यासाठी जेएनपीटी प्रशासनाविरोधात आंदोलनाची तयारी चालू असताना दिनांक १३/८/२०२६ रोजी पोलिस प्रशासनमार्फत जेएनपीटी प्रशासन (जे एन पी ए प्रशासन )कडून दोन्ही गाव कमिटी ला



चर्चेला बोलावण्यात आले होते.

ह्या चर्चेला दोन्ही गावांच्या वतीने माजी आमदार मनोहरशेठ भोईर व दोन्ही गावांचे ४-४ प्रतिनिधी उपस्थित होते. शासनाकडून जेएनपीटी चे अध्यक्ष गौरव दयाल ,जेएनपीटी चे उपाध्यक्ष,सचिव मनीषा जाधव, उपजिल्हाधिकारी ( पुनर्वसन),पनवेल प्रांत कार्यालयाचे पवन चांडक,उरण चे तहसीलदार उद्धव कदम व इतर सर्व शासकीय विभागांचे अधिकारी व न्हावा शेवा येथील सहाय्यक आयुक्त विजय चौधरी व न्हावा शेवा पोलिस स्टेशन चे सीनियर सूरज पाटील हजर होते.

चर्चेला सुरुवात झाल्यानंतर जेव्हा चेअरमन यांनी दोन्ही गावच्या प्रतिनिधीना त्यांचे विषय मांडायला सांगितले व प्रशासकीय अधिकाऱ्यांना सुद्धा ह्या सर्व प्रश्नांची उत्तरे विचारण्यात आली. शेवटी चेअरमन यांनी तहसीदारांना सांगितले की नवीन शेवा गावाचा जो १५.७५ हेक्टर जागेचा उपविभागीय अधिकारी पनवेल यांजकडील आदेश दी. १७/२/१९९० साली आज्ञापत्र बनवला आहे त्याचा कायदेशीर गॅझेट नाही व खोटा दस्तऐवज आहे व प्रलंबित असलेले पुनर्वसन मार्गी लावणे करिता जिल्हाधिकारी अलिबाग ह्यांना पत्र लिहून ८ ते १० दिवसात मिटिंग आयोजित करून २ आज्ञापत्रे रद्द करा आणि राहिलेल्या अपूर्ण पुनर्वसन पूर्ण करण्याचे काम लवकरात लवकर करुन घेणे असे आदेश दिले. व तसे पत्र नवीन शेवा कमिटीला द्या. व सिडको संबंधित जागेचा जो प्रश्न प्रलंबित आहे त्या संदर्भात सिडको एमडी ह्यांना सुद्धा जेएनपीटी ने पत्र पाठवून द्यावा व चर्चा करावी असे यावेळी ठरले.

त्याच प्रमाणे हनुमान कोळीवाडा गावाकरिता जेएनपीटी टाउनशिप च्या मागे १०.१६ हेक्टर जमीन देण्याचा प्रस्ताव तयार आहे .परंतु हनुमान कोळीवाडा गावचा पुनर्वसनाचे अनुषंगाने उपविभागीय अधिकारी पनवेल यांजकडील आदेश दि. १७/२/१९९० रद्द करणे बाबत व हनुमान कोळीवाडा ह्यांचे प्रलंबित असलेले पुनर्वसन तत्काळ करणेबाबत दोन्ही गावांची येत्या ८ ते १० दिवसांत मा. जिल्हाधिकारी,रायगड,अलिबाग यांचे अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात यावे असे जेएनपीटी चेअरमन ने उरण तहसीलदार यांना तशा प्रकारचे दोन्ही गाव प्रतिनिधीना पत्र देण्याचे सांगितले व होणारे १५ ऑगस्ट चे उपोषण व आंदोलन मागे घेण्याची विनंती केली.

# स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून 'सेवापथ सोशल फाउंडेशन'तर्फे मुकुंदवाडीतील गरजू विद्यार्थ्यांचे शालेय साहित्य वाटप; सामाजिक कार्यकर्ते संदीपभाऊ जोशींच्या प्रमुख उपस्थितीत सोहळा संपन्न

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

देशाच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त 'सेवापथ सोशल फाउंडेशन'च्या वतीने मुकुंद नगर, मुकुंदवाडी येथील श्री तुळजा भवानी प्राथमिक व माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या एकलपाल्य, अनाथ व गरजवंत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. समाजसेवक तथा कोरोनायोद्धा संदीपभाऊ जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा प्रेरणादायी उपक्रम पार पडला. श्री तुळजा भवानी शाळेत स्वातंत्र्यदिनाचा सोहळा अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. या महोत्सवात शाळेच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी शिस्तबद्ध पथसंचलन, उत्कृष्ट प्रात्यक्षिके आणि देशभक्तीपर गीते सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे




मुख्य आकर्षण असलेल्या ध्वजारोहणाचा मान प्रसिद्ध समाजसेवक संदीपभाऊ जोशी यांना मिळाला. त्यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकविण्यात आला. यावेळी शाळेचे संचालक सुभाष मोटे सर, सामाजिक कार्यकर्ते विलास वाहूळे, सेवापथ सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष शेख अकबर, जिल्हा समन्वयक मयुर भावसार, रामकिसन खर्डेकर, महिला उपजिल्हा समन्वयक मयुर मुगदल, प्रिती परदेशी यांच्यासह संस्थेचे सर्व पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला आणि कष्टांना प्रोत्साहन देताना प्रमुख पाहुणे संदीपभाऊ जोशी यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासोबतच मैदानी खेळांवरही लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन केले. तसेच, एकलपाल्य, अनाथ आणि आर्थिक परिस्थिती बिकट असलेल्या विद्यार्थ्यांनी कुठल्याही परिस्थितीत खचून न जाता अभ्यासावर पूर्ण लक्ष केंद्रित करावे, अशा विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदतीसाठी आपली संस्था व सर्व कार्यकर्ते नेहमीच तत्पर राहतील, असा विश्वास त्यांनी आपल्या भाषणात दिला.

कार्यक्रमादरम्यान सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका नीलम वाघ, सामाजिक कार्यकर्ते संदीप जोशी यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. याशिवाय संस्थेच्या आजी-माजी जिल्हा समन्वयकांनाही मानपत्र बहाल करण्यात आले.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात शाळेतील गरजवंत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत झाल्यानंतर, सेवापथ सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष शेख अकबर यांनी उपस्थित प्रमुख पाहुणे, कमिटीचे सदस्य, शाळांदचे गुरुजनवर्ग आणि पालकवर्गाचे आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शेख जमील, सुनीता खरात, सचिन मलिक, अब्दुल शेख, अनिता येताळे, सरिता साळवे, मयुर मोदे, आशा शिताळे, बाळकिसन पगारे, सय्यद नाजीम, शेख अमान आणि ओमेशकुमार राठौर आदी सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# मोठीजुई शाळेत उरण तालुक्यातील पहिल्या 'आयडियल क्लासरूम'चे उद्घाटन

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण /रायगड :** रायगड जिल्हा परिषद आदर्श शाळा मोठीजुई येथे उरण तालुक्यातील पहिल्या आयडियल क्लासरूम चे उद्घाटन पंचायत समितीचे सभापती महेश म्हात्रे यांच्या हस्ते स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. विद्यार्थ्यांना आधुनिक, आनंददायी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, तसेच वर्गातील अध्ययन-अध्यापन प्रक्रिया अधिक प्रभावी व्हावी, या उद्देशाने शाळेत आयडियल क्लासरूमची निर्मिती करण्यात आली आहे. या वर्गामध्ये विद्यार्थ्यांना आधुनिक शैक्षणिक साधनांच्या माध्यमातून विविध विषयांचे ज्ञान अधिक सोप्या व मनोरंजक पद्धतीने घेता येणार आहे.



स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने या अभिनव उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी जि. प सदस्य डॉ. मनिष ठाकूर,अविनाश ठाकूर ,प.स सदस्य दिपक भोईर,प्रारंभी गावंड,रमाकांत पाटील, गटशिक्षणाधिकारी सागर पवार, केंद्र प्रमुख हसन आवटे,मुख्याधपक अविनाश नवाले,ग्रामविकास अधिकारी रुपम गावंड,व्यवस्थापन अध्यक्ष लक्ष्मण भोईर, अमृता भोपी, योगेश भोईर,शशिकांत भोईर,रसिका भोईर, प्रमिला भोईर, उपस्थित होते.तर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी उपक्रमशीळ शिक्षक कौशिक ठाकूर,यतीन म्हात्रे, विश्वनाथ गावंड, अंकुश पाटील,काजल पाटील यांनी मेहनत घेतली. यावेळी विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

# परभणी शहरात लवकरच सुरु होणार घरगुती पीएनजी गॅस पुरवठा

## पहिल्या टप्प्यात 1,500 घरांना जोडणी ! एलपीजीच्या तुलनेत 10 ते 15 टक्के बचत

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी,:** परभणी जिल्हयातील नागरिकांसाठी आनंदाची व दिलासादायक बातमी आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू नियामक मंडळाने अधिकृत केलेल्या महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड' गेल आणि बीपीसीएलचा संयुक्त उपक्रम) कंपनी मार्फत परभणी शहरात सिटी गॅस वितरण' अंतर्गत पाईप्ड नॅचरल गॅस आणि सीएनजी नेटवर्क उभारणीचे काम हाती घेण्यात आले आहे.

पहिल्या टप्प्यामध्ये परभणी शहरातील वसमत रोड परिसरातील शिवराम नगर, आनंद नगर, कृषी सारथी कॉलनी, मथुरा नगर, येळदळकर कॉलनी, वैभव नगर आणि भाग्य नगर या भागांमध्ये सुमारे ९.८ कि. मी. लांबीची एमडीपीई गॅस पाईपलाईन टाकण्यात येत असून, याद्वारे सुमारे १,५०० घरगुती स्वयंपाकघरांना थेट पाईपलाईनद्वारे गॅस जोडणी दिली जाणार आहे.

पीएनजी गॅसचे मुख्य फायदे व वैशिष्ट्ये -- खर्चात बचत पीएनजी गॅस सध्याच्या एलपीजी सिलिंडरच्या तुलनेत सुमारे १० ते १५ टक्के स्वस्त असून सर्वसामान्यांच्या घरगुती खर्चात बचत होणार आहे. किचनपर्यंतच्या इन्फ्रास्ट्रक्चरचा खर्च मोफत-- ग्राहकांच्या घराच्या/किचनच्या बाहेरील भिंतीपर्यंत गॅस पाईपलाईन व आवश्यक इन्फ्रास्ट्रक्चर उभारण्याचा संपूर्ण खर्च एमएनजीएल कंपनी करणार असून, ग्राहकांकडून यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. व डिलिव्हरीची वाट पाहण्याची गरज उरणार नाही.

२४ तास अखंडित पुरवठा-- पाईपलाईनद्वारे २४ तास अविरत व सुरळीत गॅस पुरवठा सुरू राहणार असल्याने सिलिंडर संपण्याची भीती किंवा सिलिंडर बुकिंग

अत्यंत सुरक्षित-- पीएनजी हा नैसर्गिक वायू वायुरूपात पुरवला जातो, त्यामुळे तो घरगुती एलपीजी सिलिंडरपेक्षा अधिक सुरक्षित आहे. पर्यावरणपूरक हा गैस पूर्णपणे पर्यावरणपूरक, धूरमुक्त आणि प्रदूषणरहित आहे.

# कृषी विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम ठेवण्याची मागणी

## आकृतीबंधातील पदांवर कार्यरत कर्मचाऱ्यांना सेवेतून कमी करु नये; कृषिमंत्र्यांकडे निवेदन

**जिंतूर:-** महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागात विविध शासकीय व राज्य पुरस्कृत योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या कंत्राटी व बाह्यस्त्रोत (Outsourced) कर्मचाऱ्यांना सेवेत कायम ठेवण्यात यावे, अशी मागणी कृषी विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांनी कृषिमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, संबंधित कर्मचारी सन २००७-०८ पासून कृषी विभागातील विविध केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांमध्ये कार्यरत आहेत. राष्ट्रीय खाद्य तेल अभियान (NMEO), कडधान्य आत्मनिर्भर अभियान (PULSES), अन्न व पोषण सुरक्षा अभियान (NFSM), राष्ट्रीय कृषी विकास योजना (RKVY), प्रधानमंत्री



किसान सन्मान निधी (PM-KISAN), प्रधानमंत्री पीक विमा योजना (PMFBY), एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान (MIDH) आदी योजनांच्या अंमलबजावणीत या कर्मचाऱ्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

कृषी विभागाच्या कामकाजासाठी जिल्हा व तालुका स्तरावर नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणेच कंत्राटी कर्मचाऱ्यांवरही विविध जबाबदाऱ्या सोपविण्यात येतात. अनेक कर्मचारी गेल्या अनेक वर्षांपासून प्रामाणिकपणे व निष्ठेने सेवा बजावत असून, संबंधित कामाचा त्यांना मोठा अनुभव प्राप्त झाला आहे.

दरम्यान, महाराष्ट्र शासनाच्या कृषी व पदुम विभागाने कृषी विभागाचा नवीन पुनर्रचित आकृतीबंध शासनासमोर आणला आहे. या आकृतीबंधामध्ये विभागाच्या कामकाजासाठी आवश्यक असलेल्या पदांचा विचार करण्यात आला असून, भविष्यात कंत्राटी कर्मचाऱ्यांची पदे कमी होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे.

निवेदनात कर्मचाऱ्यांचे वय, प्रदीर्घ सेवाकाळ तसेच नवीन रोजगाराच्या संधींची मर्यादित उपलब्धता यांचा विचार करण्याची मागणी करण्यात आली आहे. अनेक वर्षांच्या सेवेनंतर अचानक रोजगार गमावल्यास संबंधित कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहावर मोठा परिणाम होऊ शकतो. त्यामुळे या कर्मचाऱ्यांच्या भविष्याचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच विविध तांत्रिक पदांवर कंत्राटी व बाह्यस्त्रोत पद्धतीने कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचा प्रदीर्घ अनुभव, वयोमान आणि संबंधित पदावरील प्रत्यक्ष कामाचा अनुभव लक्षात घेऊन त्यांच्या सेवेबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. दि. ११ ऑगस्ट २०२६ रोजीच्या मंजूर आकृतीबंधाच्या पार्श्वभूमीवर, केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांच्या सुरुवातीपासून सेवेत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवेत कोणताही खंड पडू न देता त्यांना सेवेत निरंतर ठेवावे, अशी आग्रही मागणी कृषी विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांनी केली आहे.

या मागणीचे निवेदन कृषिमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांच्याकडे सादर करण्यात आले असून, शासनाने या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या रोजगाराचे संरक्षण करावे, अशी अपेक्षा कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911